पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – २३०**

(सभावृत्तांत)

**दिनांक – ०७/०७/२०२१** **वेळ – दु.२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार, दिनांक **०७/०७/२०२१** रोजी **दु.०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील मा.महापौर मधुकरराव पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/ प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य ऑनलाईन व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित होते.

**१. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे – सभापती**
२. मा.कदम शशिकांत गणपत
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.संतोष बबन कांबळे
५. मा.अभिषेक गोविंद बारणे
६. मा.फुगे भिमाबाई पोपट
७. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
८. मा.भोईर सुरेश शिवाजी
९. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१०. मा.यादव मीनल विशाल
११. मा.भालेकर प्रविण महादेव
१२. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
१३. मा.पाडाळे निता विलास

याशिवाय मा.राजेश पाटील – आयुक्त, मा.विकास ढाकणे – अति.आयुक्त(१), मा.उल्हास जगताप – नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.कुंभोजकर – मुख्य लेखा परिक्षक, मा.राजन पाटील – शहर अभियंता, मा.डॉ.राय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.नाळे – उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर, मा.दुरगुडे, मा.लोणकर – उप आयुक्त, मा.निकम, मा.भालकर, मा.सवणे, मा.तांबे, मा.इंगळे – सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.देशमुख – सहाय्यक आयुक्त, मा.मुढे – प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक शिक्षण), मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता वायसीएमएच, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.मोरे, मा.सेठिया, मा.वाघुंडे, मा.पोरेड्डी, मा.धुमाळ – कार्यकारी अभियंता,मा.हराळे, मा.पानसरे – प्रशासन अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, हे अधिकारी उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.३४) महापालिका आर्किटेक्ट पॅनलवर घेणेबाबत. – मा.भिमाबाई फुगे, मा.नीता पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थांना शैक्षणिक अभ्यासक्रमाचे सॉफ्टवेअर सह टॅब (ई लर्निंग) साहित्य देणेबाबत.- मा.भिमाबाई फुगे, मा.नीता पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३६) ठराव क्र.८०४५ दि.१३/०१/२०२१ मध्ये दुरूस्ती करणेबाबत. - मा.भिमाबाई फुगे, मा.नीता पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३७) फ क्षेत्रिय कार्यालयातील प्रभाग क्र.१३ मधील नविन क्रिडा विषयक विकास कामांचे निविदा काढणेसाठी सन २०२१-२०२२ चे अंदाजपत्रकात तरतूदी वर्गीकरण करणेबाबत. - मा.भिमाबाई फुगे, मा.नीता पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३८) सर्पमित्र/प्राणीमित्र मानधनावर नेमणेबाबत - मा.भिमाबाई फुगे, मा.नीता पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३९) मा.स्थायी समिती ठराव क्र.९६३६ दि.०९/०६/२०२१ मध्ये दुरूस्तीबाबत. - मा.भिमाबाई फुगे, मा.नीता पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४०) मा.स्थायी समिती ठराव क्र.९७९३ दि.२३/०६/२०२१ मध्ये दुरूस्ती करणेबाबत. मा.भिमाबाई फुगे, मा.नीता पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४१) वाकड प्रभाग क्र.२५ येथे नव्याने विकसित होणा-या विविध रस्त्यांवर विद्युत विषयक कामे करणेकरीता तरतुद वर्गीकरण करणेबाबत. - मा.भिमाबाई फुगे, मा.नीता पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४२) सुरक्षारक्षकाची नेमणूक करणेबाबत. - मा.राजू बनसोडे, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४३) प्रभाग क्र.२२ येथील पवनानगर व विजयनगर येथील जुन्या मलनिस:रण नलिकांची सुधारणा विषयक कामे करणे या कामासाठी सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षासाठी वर्गीकरण करून रक्कम उपलब्ध करून देणेबाबत. - मा.नीता पाडाळे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक – ९८५८ विषय क्रमांक – १

दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – स्थापत्य EWS

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचे पत्र क्र.स्था/नि/EWS/५११/२०२१, दि.०९/०६/२०२१

मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.81/06/2020-2021 अन्वये JnNURM BSUP शहर झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत लिंकरोड पत्राशेड पॅकेज क्र.७ अ मधील इमारतींची स्थापत्य, पाणीपुरवठा, विद्युत, जलनि:सारण कामांची दुरुस्तीची कामे करणेकामी मे.देव कन्स्ट्रक्शन नि.र.रू.4,97,47,156/-

(अक्षरी र.रु.चार कोटी सत्त्यान्नव लाख सत्तेचाळीस हजार एकशे छपन्न फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.4,97,21,906/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.4,97,21,906/- पेक्षा 15.77% कमी म्हणजेच र.रु.4,18,80,761/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.25,250/- = एकुण र.रु.4,19,06,011/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८५९ विषय क्रमांक – २

दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – आपत्ती व्यवस्थापन

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप.व्य/०१/कावि/१८२/२०२१, दि.१४/०६/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

कोवीड–१९ संसर्गजन्य आजार प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत लसीकरण केंद्रावर होत असलेल्या गर्दीवर नियंत्रण मिळवणेकामी व गर्दीस शिस्त लावणेकामी नेमणेत आलेल्या दूर्गा ब्रिगेड यांचे स्वयंसेवकांचे नेमणूकीस देणेत आलेल्या १ महिना कालावधीचे मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८६० विषय क्रमांक – ३

दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – क क्षेत्रिय, जलनिःसारण

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.कक्षेका/जनि/२५३/२०२१, दि.०८/०६/२०२१

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे क प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणेकामी मे.आर्यन पंप्स ॲन्ड एन्व्हायरो सोल्युशन प्रा. लि. हे करीत आहेत. सदर कामाचे निविदा अटी शर्ती(A) मधील अट क्र.४ नुसार सदर निविदेचा कालावधी ५ वर्षांचा असुन सुरुवातीस कामाचा आदेश १ वर्षासाठी द्यावयाचा आहे. त्यानंतर कामाची प्रगती, Performance विचारात घेवून पुढील प्रत्येक वर्षासाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेचे मुदत वाढ देणेत येईल याप्रमाणे अटी व शर्तीमध्ये नमुद करणेत आलेले आहे. मनपाच्या 'क' प्रभागातील कामाची ५ वर्ष कालावधीची मुदत दि.३०/०६/२०२१ रोजी संपत आहे. सदरचे काम नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने अखंडीत सुरु ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे उपरोक्त कामांकरीता नविन निविदा कार्यवाही पुर्ण होऊन नविन काम सुरु होईपर्यंत

सदरचे काम सुरु ठेवणे आवश्यक आहे. परंतु मागील वर्षापासून उद्भवलेल्या कोरोनाच्या (Covid-19) जागतिक संकटामुळे सदर कामांच्या निविदा कार्यवाहीचे काम अपेक्षीत वेळेत पुर्ण होऊ शकले नाही. तथापि, अद्यापपर्यंत 'क' प्रभागातील जलनि:सारण नलिका व चेंबर्सची साफ सफाई करणे व चोकअप काढणेचे नविन कामाची निविदा कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितीत विषयांकित कामांची नविन निविदा कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे सदर कामांची निविदा कार्यवाही होऊन नव्याने कामाचा आदेश देणेकरीता आणखी कालावधी लागणार आहे, तसेच सदरचे काम अत्यावश्यक सेवेचे असल्याने मनपामार्फत अखंडीत सुरु ठेवणे गरजेचे आहे. तरी सदर कामास सन २०२०-२०२१ च्या जुन्या दरा प्रमाणेच तीन महिन्यांसाठी मुदतवाढ घेणे आवश्यक आहे. त्या कामांची माहिती खालील तक्त्यात नमुद केलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम व निविदा दर | ठेकेदाराचे नाव | कामाचा आदेश, दिनांक व मुदत | स्थायी समिती मान्यतेकामी र.रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचे क प्रभागातील जलनिःसारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पद्धतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे (निविदा क्र.१२/०२/२०१४-१५) | र.रू.१,०५,५१,२७६/- दर–१.५०% कमी | मे.आर्यन पंप्स ॲन्ड एन्व्हायरो सोल्युशन प्रा.लि. | **प्रथम-** जनि/०२/कावि/४३७/२०१६, दि.०२/०७/२०१६ **द्वितीय-** जनि/०२/कावि/३००/२०१७, दि.१६/०९/२०१७ **तृतीय-** जनि/०२/कावि/१६४१/२०१८, दि.२४/०९/२०१७ **चतुर्थ-** जनि/०२/कावि/२०१९, दि.२०/०९/२०१९ **पाचवे-** जनि/०२/कावि/७५७/२०२०, दि.२३/०९/२०२० | र.रू.३३,७७,८२४/- | |

'क' क्षेत्रीय कार्यालयातील कामास मागील वर्षातील निविदा दरात वाढ न करता वरील प्रपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे र.रू.३३,७७,८२४/- पर्यंत काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८६१ विषय क्रमांक – ४

दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – ब क्षेत्रिय, आरोग्य

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.नीता पाडाळे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांचे पत्र क्र.बक्षेका/५/कावि/२९१/२०२१, दि.२४/०६/२०२१

मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांची शिफारस विचारात घेवून –

ब क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.१७,२२ मधील शौचालय/मुतारी ११० सिट्सची मनुष्यबळ व यांत्रिकी पध्दतीने तसेच आवश्यक रसायने वापरून दिवसातून ४ वेळा साफसफाई करणेबाबत कामकाजासाठी निविदा नोटीस क्र.०२/०३/२०२०-२१ निविदा र.रु.६९,९८,२९७/- करीता ३ वर्ष

कालावधीसाठी मे.तावरे फॅसिलीटी मॅनेजमेंट सर्विसेस प्रा.लि. यांचा -23.490% कमी (५३,५४,३९७.०३५/-) हा दर सर्वात लघुत्तम असल्याने तसेच त्यांनी सादर केलेल्या दरपृथरकणानुसार महापालिकेने अंदाजपत्राकामध्ये नमुद केलेल्या किमान वेतन दराचे पालन होत आहे.दरचा दर स्विकृतीस मा. अति.आयुक्त(१) यांनी दि.२४/०६/२०२१ च्या प्रस्तावानुसार मान्यता दिलेली आहे. सबब सदरचे कामासाठी येणा-या र.रु.५३,५४,३९७/- (अक्षरी र.रु.त्रेपन्न लाख चौप्पन्न हजार तीनशे सत्याण्णव फक्त) चे अपेक्षीत खर्चास व त्यानुसार ठेकेदार म्हणून नेमणूक करणे, याकामी त्यांच्याशी आवश्यक अटी/शर्तीचा करारनामा करणे, कामाचा आदेश देणे तसेच किमान वेतन दराने देय वेतन तसेच राज्य शासनाने किमान वेतन दराच्या विशेष भत्त्यात वाढ केल्यास त्यानुसार अदा करावयाच्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील कामासाठी र.रू.५३,५४,३९७/- (अक्षरी र.रू.त्रेपन्न लाख चौपन्न हजार तीनशे सत्यान्नव फक्त) इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८६२ विषय क्रमांक – ५

दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – ब क्षेत्रिय, आरोग्य

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.नीता पाडाळे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांचे पत्र क्र.बक्षेका/५/कावि/२९३/२०२१, दि.२४/०६/२०२१

मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांची शिफारस विचारात घेवून –

ब क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.१६ मधील शौचालय/मुतारी १५० सिट्सची मनुष्यबळ व यांत्रिकी पध्दतीने तसेच आवश्यक रसायने वापरून दिवसातून ४ वेळा साफसफाई करणेबाबत कामकाजासाठी निविदा नोटीस क्र.०२/०१/२०२०-२१ निविदा र.रु.१,०४,०८,३४६/- करीता ३ वर्ष कालावधीसाठी मे.श्री.संत साई स्वयंरोजगार सेवा संस्था यांचा -२१.५००% कमी (८१,७०,५५१.६१/-) हा दर सर्वात लघुत्तम असल्याने व त्यांनी सादर केलेल्या दर पृथरकणानुसार महापालिकेने अंदाजपत्राकामध्ये नमुद केलेल्या किमान वेतन दराचे पालन होत आहे. सदरचा दर स्विकृतीस मा. अति.आयुक्त(१) यांनी दि. २४/०६/२०२१ च्या प्रस्तावानुसार मान्यता दिलेली आहे. सबब सदरचे कामासाठी येणा-या र.रु.८१,७०,५५२/- (अक्षरी र.रु.एक्याऐंशी लाख सत्तर हजार पाचशे बावन्न फक्त) अपेक्षीत खर्चास व त्यानुसार ठेकेदार म्हणून नेमणूक करणे, याकामी त्यांच्याशी आवश्यक अटी/ शर्तीचा करारनामा करणे, कामाचा आदेश देणे तसेच किमान वेतन दराने देय वेतन तसेच राज्य शासनाने किमान वेतन दराच्या विशेष भत्त्यात वाढ केल्यास त्यानुसार अदा करावयाच्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील कामासाठी र.रू.८१,७०,५५२/- (अक्षरी र.रू.एक्याऐंशी लाख सत्तर हजार पाचशे बावन्न फक्त) इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८६३ विषय क्रमांक – ६
दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – ब क्षेत्रिय, आरोग्य
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.नीता पाडाळे
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांचे पत्र क्र.बक्षेका/५/कावि/२९२/२०२१, दि.२४/०६/२०२१

मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांची शिफारस विचारात घेवून –

ब क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.१८ मधील शौचालय/मुतारी २२७ सिट्सची मनुष्यबळ व यांत्रिकी पध्दतीने तसेच आवश्यक रसायने वापरून दिवसातून ४ वेळा साफसफाई करणेबाबत कामकाजासाठी निविदा नोटीस क्र.०२/०२/२०२०-२१ निविदा र.रु.१,४०,३८,१७५/- करीता ३ वर्ष कालावधीसाठी मे.तावरे फॅसिलीटी मॅनेजमेंट सर्विसेस प्रा.लि. यांचा -21.690% कमी (१,०९,९३,२९४.८४३/-) हा दर सर्वात लघुत्तम असल्याने तसेच त्यांनी सादर केलेल्या दरपृथरकणानुसार महापालिकेने अंदाजपत्राकामध्ये नमुद केलेल्या किमान वेतन दराचे पालन होत आहे.सदरचा दर स्विकृतीस मा. अति.आयुक्त (१) यांनीदि. २४/०६/२०२१ च्या प्रस्तावानुसार मान्यता दिलेली आहे. सबब सदरचे कामासाठी येणा-या र.रु.१,०९,९३,२९५/- (अक्षरी र.रु.एक कोटी नऊ लाख त्र्याण्णव हजार दोनशे पंच्याण्णव फक्त) अपेक्षीत खर्चास व त्यानुसार ठेकेदार म्हणून नेमणूक करणे, याकामी त्यांच्याशी आवश्यक अटी/शर्तीचा करारनामा करणे, कामाचा आदेश देणे तसेच किमान वेतन दराने देय वेतन तसेच राज्य शासनाने किमान वेतन दराच्या विशेष भत्त्यात वाढ केल्यास त्यानुसार अदा करावयाच्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांची मागणी असली तरी, प्रस्तुत कामासाठी र.रू.१,०९,९३,२९५/- (अक्षरी र.रू.एक कोटी नऊ लाख त्र्यान्नव हजार दोनशे पंच्यान्नव फक्त) इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८६४ विषय क्रमांक – ७
दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – ग क्षेत्रिय, आरोग्य
सुचक – मा.नीता पाडाळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्र.गक्षेका/४/कावि/४३१/२१, दि.२५/०६/२१

मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ग क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभागातंर्गत सार्वजनिक शौचालय व मुता-यांची यांत्रिकी पद्धतीने (पाण्याचे उच्चदाब फवा-याचे सहाय्याने) व मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई व देखभाल दुरुस्ती करणेच्या कामासाठी निविदा नोटीस क्र.२/२०१८-२०१९ र.रु.७५,३५,५०८/- ची प्रसिध्द करणेत आली होती, त्याप्रमाणे प्रति २०० सिट्स साफसफाई करणेकरीता १ टाटा ए.सी.ई. किंवा समकक्ष चार चाकी वाहन व प्रति वाहनावर १ वाहन चालक व २ कामगार पुरवून साफसफाई करणेकरीता आदेश क्र.गक्षेका/आ/४/कावि/७८/२०१९ दिनांक २९/०१/२०१९ अन्वये मे.शुभम उद्योग, पिंपरी यांना दिनांक ११/०१/१९ ते १०/०१/२०२१ अखेर आदेश देण्यात आलेला होता. सदर कामाची मुदत दिनांक १०/०१/२०२१ रोजी संपुष्टात आली असल्याने, आदेश क्र. गक्षेका/आ/४/कावि/ १६६/२०२१ दिनांक २६/०२/२०२१ अन्वये दिनांक ११/०१/२०२१ ते १०/०४/२०२१ अखेर (३ महिने) अथवा नविन निविदा कार्यवाही पूर्ण होईपर्यंत या कालावधीकरीता मुदतवाढ देणेत आली होती. सदर कामाची मुदत दिनांक १०/०४/२०२१ रोजी संपुष्टात आली आहे. सदर कामकाज हे अत्यावश्यक सेवेचे असल्याने, सदर कामाची नविन निविदा प्रसिध्दीची कार्यवाही ग

क्षेत्रीय कार्यालय आरोग्य मुख्यालय स्तरावर चालु असून, नविन निविदा प्रक्रियेस विलंब होण्याची शक्यता असल्याने, सदर निविदेस दिनांक ११/०४/२०२१ ते १०/१०/२०२१ अखेर (६ महिने) अथवा नविन निविदा कार्यवाही पूर्ण होऊन आदेश देईपर्यंत, या दोन्हींपैकी जे प्रथम होईल तोपर्यंत, मे.शुभम उद्योग,पिंपरी या संस्थेस मुदतवाढ देणेस व त्याकरीता होणारा पूर्णांकींत अंदाजीत खर्च र.रु.१३,००,०००/- (अक्षरी र.रु.तेरा लाख फक्त) यास मान्यता देणेची मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील कामास ४ महिने मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८६५ विषय क्रमांक – ८

दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – ग क्षेत्रिय, विद्युत

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र.वि/गक्षे/थेर/१/४९०/२०२१, दि.२५/०६/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग क्षेत्रीय कार्यक्षेत्रात थेरगाव येथील नविन हॉस्पिटल इमारतीवर सोलर सिस्टिम बसविणे ह्या कामाची निविदा काढणेत आली आहे. त्यांची निविदा र.रु.३३,३०,७९२/- इतकी आहे. सदरचे काम “अपारंपारिक उर्जा स्रोतापासून विजनिर्मिती करणे” या मुख्य कार्यालयाकडील भांडवलीच्या लेखाशिर्षकावरुन काढणेत आले आहे. सदर कामास सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकात र.रु.१०,००,०००/- इतकी तरतुद असल्याने, ती पुरेशी नाही त्यामुळे काम करणे शक्य होत नाही. सदरचे काम करणे आवश्यक असल्याने, सदर कामासाठी र.रु.२१,००,०००/- इतकी तरतुद वर्गीकरण करावे लागणार असल्याने ट्राफीक सिग्नल या लेखाशिर्षकावरील अदांजपत्रकातील पान क्र.३६४ अ.क्र.१, २ व ५ च्या तरतुदीतुन वर्गीकरण करणे शक्य आहे. त्याची सविस्तर माहीती सोबतच्या तक्त्यात दिली आहे. सबब, सन २०२१-२२ अंदाजपत्रकातील ट्राफीक सिग्नल लेखाशिर्षकातुन, सोबतच्या तक्त्यात नमुद अ.क्र.१, २ व ३ या कामावरुन र.रु.२१,००,०००/- (अक्षरी र.रु.एकविस लाख फक्त) तरतुद मनपाच्य अदांजपत्रकातील पान क्र.३६८ अ.क्र.२ व तक्त्यातील अ.क्र.४ येथील मुख्य कार्यालय भांडवली अंर्तगत “अपारंपारिक उर्जा स्रोतापासून विज निर्मिती करणे” या लेखाशिर्षकावर वर्ग करणेस मान्यतादेणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८६६ विषय क्रमांक – ९

दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/२६७/२०२१, दि.२८/०६/२०२१

विषय – मनपा दवाखाने/रुग्णालयांसाठी बेडशिट, सोलापुरी ब्लँकेट व चादर खरेदी करणेस मान्यता देणेबाबत.

विषय क्र.९ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८६७ विषय क्रमांक – १०

दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/८/कावि/१११८/२०२१, दि.२८/०६/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विविध रुग्णालये, जंम्बो कोविड सेंटर, ऑटो क्लस्टर कोविड हॉस्पिटल या ठिकाणी कोरोना विषाणुमुळे संसर्ग झालेल्या बाधित रुग्णावर वैद्यकिय उपचाराकरीता आवश्यक असणारे Inj.Remdesivir 100 Mg तातडीने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.सद्यस्थितीत मनपाचे विविध रुग्णालये तसेच कोवीड हॉस्पीटल करीता आवश्यक असणारे Inj.Remdesivir 100 Mg – 4,000 Vials खरेदी करणेकामी थेट पध्दतीने मे.श्री.विनायक फार्मा., पुणे यांचेकडुन Dr.Reddy या कंपनीचे दर र.रु.1948.80 प्रति व्हायल्स (सर्व करासहीत) असा आहे. या दराने 4,000 व्हायलस खरेदीकामी एकुण र.रु.77,95,200/- (अक्षरी र.रु.सत्याहत्तर लाख पंच्याण्णव हजार दोनशे फक्त) (सर्व करासहीत) इतका खर्च झालेला आहे. सदरचे खर्चास भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना दिनांक १३/०३/२०२० व १४/०३/२०२० व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधिल कलम ४१ व ५०, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३)(क) तसेच महापालिका अधिनियम अनुसुची प्रकरण ५(२)(२) नुसार मे.श्री.विनायक फार्मा., पुणे यांचेकडुन थेट पध्दतीने करारनामा न करता खरेदीकामी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८६८ विषय क्रमांक – ११

दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/७७५/२०२१, दि.२९/०६/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.43/94/2020-21 अन्वये प्रभाग क्र.६ मधील सद्गुरु नगर, लांडगे वस्ती, महादेव नगर व परिसरात स्थापत्य विषयक सुधारणेची कामे करणेकामी मे.जी.आर.मंगोडेकर नि.र.रू.44,91,139/- (अक्षरी र.रु.चव्वेचाळीस लाख एक्याण्णव हजार एकशे एकोणचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.44,50,489/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.44,50,489/- पेक्षा 18.00% कमी म्हणजेच र.रु.36,49,401/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.18,372/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.40,650/- = एकुण र.रु.37,08,423/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८६९ विषय क्रमांक – १२
दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – स्थापत्य ह मुख्यालय
सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/७७४/२०२१, दि.२९/०६/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.99/11/2020-21 अन्वये प्रभाग क्र.३२ जुनी सांगवी परिसरात स्थापत्य विषयक कामे करणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे.ओम्कार ग्रुप नि.र.रू.29,99,966/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख नव्व्यान्नव हजार नऊशे सहासष्ठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,27,666/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,27,666/- पेक्षा 33% कमी म्हणजेच र.रु.19,61,536/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.6,501/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.72,300/- = एकुण र.रु.20,40,337/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८७० विषय क्रमांक – १३
दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – विद्युत क क्षेत्रिय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कक्षेका/वि/जा/३२८/२०२१, दि.२८/०६/२०२१

विषय - क क्षेत्रीय विद्युत मुख्य कार्यालय विभागाकडील भांडवली अदांजपत्रकातील सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकातील प्रभाग क्र.९ मासुळकर कॉलनी येथील नेत्र रूग्णालय येथे सीसीटिव्ही यंत्रणा बसविणे याकामासाठी तरतूद वर्गीकरणाबाबत.

विषय क्र.१३ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८७१ विषय क्रमांक – १४
दिनांक –०७/०७/२०२१ विभाग –पदव्युत्तर संस्था YCMH
सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.सुरेश भोईर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. YCMH/१५/कावि/९३२/२०२१, दि.२५/०६/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयामधील रुबी एलकेअर संचालित हृदयरोग केंद्राची महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना लागू करणेत आलेली आहे. याबाबत रुबी एलकेअर यांचे सोबत करारनामा करणेत आला होता. सदर करारनाम्याची मुदत दि.२३/०२/२०२१ रोजी संपुष्टात येत आहे. नागरीकांचे सोईचे दृष्टीने सदर योजना चालु ठेवणे आवश्यक आहे. सबब सदरचा करारनामा ५ वर्ष मुदतीसाठी दि.२४/०२/२०२१ ते दि.२३/०२/२०२६

अखेर मुदतवाढ मिळणेस मान्यता रुबी एलकेअर संचालित हृदयरोग केंद्राची महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना लागू करणेत आलेली आहे. याबाबत रुबी एलकेअर यांचेसोबत करारनामा करणेत आला होता. सदर करारनाम्याची मुदत दि.२३/०२/२०२१ रोजी संपुष्टात येत आहे. नागरीकांचे सोईचे दृष्टीने सदर योजना चालु ठेवणे आवश्यक आहे. सबब सदरचा करारनामा ५ वर्ष मुदतीसाठी दि.२४/०२/२०२१ ते दि.२३/०२/२०२६ अखेर मुदतवाढ मिळणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८७२ विषय क्रमांक – १५

दिनांक –०७/०७/२०२१ विभाग –ह क्षेत्रिय, स्थापत्य

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.नीता पाडाळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/हक्षे/कावि/१६८/२०२१, दि.२५/०६/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ह क्षेत्रिय कार्यालयाकडील प्रभाग क्र.३२ मधील खालील कामांची निविदा कार्यवाही चालू असून कामांच्या दराचे पाकीट उघडणेत आलेले आहे.

| अ.क्र | निविदा क्र | कामाचे नाव | निविदा र.रू |
|---|---|---|---|
| १ | ८७/१/२०२०-२१ | प्रभाग क्र.३२ मधील सांगवी परिसरातील मुख्य रस्ते अद्यावत पध्दतीने विकसित करणे. | ८३१३०५२८ |
| २ | ८७/२/२०२०-२१ | प्रभाग क्र.३२ मधील सांगवी परिसरातील अंतर्गत रस्ते अद्यावत पध्दतीने विकसित करणे. | ८३११०५३२ |

निविदा अटी व शर्तीनुसार अट क्र.१४ नुसार आवश्यक परफॉर्मन्स सिक्युरिटी अनामत आठ दिवसात भरणे आवश्यक आहे. आठ दिवसात परफॉर्मन्स सिक्युरिटी अनामत सादर न केल्यास लघुत्तम १ ची निविदा रद्द करून लघुत्तम २ यास विचारणा करणेत येईल अशी अट आहे. लघुत्तम १ ठेकेदार यांनी परफॉर्मन्स सिक्युरिटी अनामत दिली नाही. त्यास अनुसरून दि.१६/०४/२०२१ रोजी लघुत्तम २ ठेकेदारास लघुत्तम १ ठेकेदारास यांचे पेक्षा कमी दरात काम करणेस तयार आहात का याबाबत विचारणा केली आहे. परंतू उपरोक्त दोन्ही कामांच्या लघुत्तम २ ठेकेदार यांनी अद्यापपर्यंत उत्तर दिलेले नाही. मा.महापौर यांनी दि.२४/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त दोन्ही कामांची निविदा कार्यवाही स्थगित करून त्या कामांची तरतूद प्रभाग क्र.३२ सांगवी मधील आरक्षण क्र.३२७ विकसित करणे (सांस्कृतिक भवन) व प्रभागातील इतर कामे करणेकामी वर्गीकरणाव्दारे उपलब्ध करून देणेबाबत कळविले आहे. त्यास अनुसरून कामांचा वाढ/घट प्रस्ताव खालील प्रमाणे –

| अ.क्र | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र | लेखाशिर्ष | सन २०२१-२२ ची तरतूद | वाढ | घट | सन २०२१-२२ साठी आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.३२ मधील सांगवी परिसरातील अंतर्गत रस्ते अद्यावत पध्दतीने विकसित करणे. | ३१ | २३७ | विशेष योजना | १५०००००० | - | १४९००००० | १००००० |
| २ | प्रभाग क्र.३२ मधील सांगवी परिसरातील मुख्य रस्ते अद्यावत पध्दतीने विकसित करणे. | ३१ | २३८ | विशेष योजना | १५०००००० | - | १४९००००० | १००००० |
| ३ | प्रभाग क्र.३२ सांगवी मधील आरक्षण क्र.३२७ विकसित करणे. | ५३ | १०९ | विशेष योजना | ६०००००० | २९८००००० | - | ३५८००००० |

तरी उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केलेनुसार कामांच्या तरतूदीमध्ये वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८७३ विषय क्रमांक – १६

दिनांक –०७/०७/२०२१ विभाग - उद्यान

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.नीता पाडाळे

संदर्भ – मा.उप आयुक्त यांचे पत्र क्र. उद्यान/६/कावि/२४०/२०२१, दि.२८/०६/२०२१

मा.उप आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.७/२०२०-२१ अन्वये उदयान विभागासाठी उदयानात पाणीपुरवठा करणेकामी जुन्या बोअरवेल दुरुस्त करणे व आवश्यकतेनुसार नविन बोअरवेल घेणेबाबत मे.जीवनधारा टयुबवेल कंपनी या ठेकेदारांची निविदा र.रू.२४,९३,३८६/- (अक्षरी र.रू.चोवीस लाख त्र्याण्णव हजार तीनशे शहाऐंशी फक्त) पेक्षा -१% टक्के ने कमी दराची निविदा मंजुर दराने १ वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.२४,६८,४५२/- (अक्षरी र.रु.चोवीस लाख अडुसष्ट हजार चारशे बावन्न फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेची मा.उप आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील कामासाठी र.रू.२४,६८,४५२/- (अक्षरी र.रू.चौवीस लाख अडुसष्ठ हजार चारशे बावन्न फक्त) इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८७४ विषय क्रमांक – १७

दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र. मभां/१५/कावि/२७१/२०२१, दि.२९/०६/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि.14/03/2020 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम (41 व 50), महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा(COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपामार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्ण तसेच नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्रमांक 10/2020-21 अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर रुपये 180/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण 15 पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा आदेशानुसार दि.18/04/2021 अखेर र.रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति व दि.19/04/2021 पासून रुपये 230/- प्रति दिन प्रति व्यक्ती याप्रमाणे सबंधित पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे/रात्रीचे यापैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन नमुद केलेल्या कालावधीमध्ये होणा-या र.रू.3,31,890/-(अक्षरी र.रू.तीन लाख एकतीस हजार आठशे नव्वद फक्त) चे खर्चास मान्यता व पुरवठादार मे.ब्राईट केटरिंग सर्व्हिसेस यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८७५ विषय क्रमांक – १८

दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – नागरवस्ती विकास योजना

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.नीता पाडाळे

संदर्भ – मा.उप आयुक्त यांचे पत्र क्र. नावियो/१/कावि/४६१/२०२१, दि.२८/०६/२०२१

मा.उप आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

नागरवस्ती विकास योजना विभागाच्या "टायर ट्युब खरेदी" या लेखाशिर्षावर सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात र.रू.५०,०००/- इतकी तरतुद केली असुन आज अखेर सदर लेखाशिर्षावर र.रू.५०,०००/- इतकी शिल्लक आहे. सदर रक्कमेतुन दर्शन टायर्स, एम्पायर इस्टेट पुणे मुंबई रोड यांचेकडुन खरेदी करून त्यांना एकुण र.रू.२३,०००/- (अक्षरी र.रू.तेवीस हजार फक्त) चे बीले अदा करणेस व सदरचा खर्च "टायर ट्युब खरेदी" या उपलेखाशिर्षा वरील उपलब्ध तरतुदीमधुन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८७६ विषय क्रमांक – १९

दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र. मभां/१५/कावि/२७०/२०२१, दि.२९/०६/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि.14/03/2020 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम (41 व 50), महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपामार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्ण तसेच नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्रमांक10/2020-21 अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर र.रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण 15 पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा आदेशानुसार दि.18/04/2021 अखेर र.रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति व दि.19/04/2021 पासून रुपये 230/- प्रति दिन प्रति व्यक्ती याप्रमाणे सबंधित पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे/रात्रीचे यापैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन नमुद केलेल्या कालावधीमध्ये होणा-या र.रू.24,80,320/-(अक्षरी र.रू.चोवीस लाख ऐंशी हजार तीनशे वीस फक्त) चे खर्चास मान्यता व पुरवठादार मे.जोशी बंधू केटरर्स यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८७७ विषय क्रमांक – २०
दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.नीता पाडाळे
संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र. मभां/५/कावि/९५७/२०२१, दि.२८/०६/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांची शिफारस विचारात घेवून –

मनपाच्या विविध विभागांसाठी, वैद्यकिय विभाग, विविध रुग्णालये यांचेसाठी नियमितपणे दैनंदिन कामकाजासाठी वेळोवेळी आवश्यकतेनुसार तसेच मागणीनुसार करावयाच्या छपाई साहित्याच्या संदर्भात ई-निविदा सुचना क्र.30/2019-20 अन्वये लघुत्तम निविदाकार मे.जयगणेश ऑफसेट, पुणे, मे.आनंद एंटरप्रायजेस, चिंचवड मे.आशिष एंटरप्रायजेस, चिंचवड व मे.अमृत मुद्रणालय, चिंचवड यांचेकडून त्यांचे निविदा मंजुर दरानुसार केलेल्या दर करारानुसार एकुण र.रु.60,00,000/- च्या खर्च मर्यादेत मनपा विविध विभागांच्या आवश्यकतेनुसार व मागणीनुसार छपाई साहित्य खरेदी करणेसाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मा.अति.आयुक्त (१) यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील कामासाठी र.रू.६०,००,०००/- (अक्षरी र.रू.साठ लाख फक्त) इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८७८ विषय क्रमांक – २१
दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र. मभां/१५/कावि/२६९/२०२१, दि.२९/०६/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि.14/03/2020 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम (41 व 50), महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा(COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपामार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्ण तसेच नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्रमांक10/2020-21 अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर रुपये180/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण15 पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा आदेशानुसार दि.18/04/2021 अखेर र.रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति व दि.19/04/2021 पासून रुपये 230/- प्रति दिन प्रति व्यक्ती याप्रमाणे सबंधित पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे/रात्रीचे यापैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन नमुद केलेल्या कालावधीमध्ये होणा-या र.रू.23,89,650/- (अक्षरी र.रू.तेवीस लाख एकोणनव्वद हजार सहाशे पन्नास फक्त) चे खर्चास व पुरवठादार मे. अन्नामृत फाऊंडेशन यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यतादेणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८७९ विषय क्रमांक – २२

दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – वाहन दुरूस्ती कार्यशाळा

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.काशा/१/कावि/३७४/२०२१, दि.२९/०६/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारत सरकार तसेच राज्य शासनाने "कोरोना" विषाणु कोविड १९ प्रादुर्भाव रोखणेसाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १९८७ दिनांक १३ मार्च २०२० पासुन लागु करुन अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याप्रमाणे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ लागु करुन राष्ट्रीय आपत्ती घोषित करुन "कोरोना" विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी युध्दपातळीवर कामकाज करणेत येत आहे.पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्रात कोरोना या विषाणूचा प्रसार कमी होत असल्याने असल्यानेमहाराष्ट्र राज्य शासनाने नियमावली तयार केली असुन त्याची अंमलबजावणी करुन हॉटेल्स्, मंगल कार्यालये, मंडई तसेच शासकीय / खाजगी व गर्दीच्या ठिकाणी मास्क न वापरता संचार करणा-या व्यक्तींवर दंडात्मक कारवाई कऱणे संदर्भात निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार मा.आयुक्त सो.यांचेकडील आदेश क्र. प्रशा/१/कावि/५७७/२०२१ दि.२४/०५/२०२१ चे आदेशान्वये म.न.पा. हद्दीतील सर्व आस्थापना, बार, रेस्टॉरंट, मंगल कार्यालये तसेच भाजी मंडईवर येथील गर्दीवर नियंत्रण ठेवणेकरीता प्रभाग स्तरावर भरारी पथक निर्माण करणेत आलेले आहे. त्यानुसार इकडील विभागाकडुन दि.२४/०५/२०२१ पासुन हॉटेल, रेस्टॉरंट व उपहारगृहे तसेच शासकीय व खाजगी ठिकाणी दंडात्मक कारवाई पथकाकरीता ०४ इनोव्हा वाहने मे.सॅम इंटरप्रायजेस यांचेकडून उपप्रादेशिक परिवहन कार्यालय,पिंपरी चिंचवड यांचेकडील मंजुर दराप्रमाणे करारनामा न करता, निविदा न मागविता, थेट पद्धतीने उपलब्ध करुन दिलेली आहेत. प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडील रुग्णवाहीका यांचे भाडेदर - परिचलन पध्दतीनुसार पुणे, पिंपरी चिंचवड व बारामती यांची संयुक्त बैठक क्र.४८, दि.१७/०५/२०२० चे अन्वये मंजूर दर खालील प्रमाणे -

| अ.क्र | पुरवठादार | वाहन प्रकार | प्रति दिन प्रती वाहन मंजूर दर इंधनासहीत र.रु. | वाहन संख्या | अंदाजे कामाचे दिवस | अंदाजे खर्च र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे.सॅम इंटरप्रायझेस | इनोव्हा | ४,१००/- | ४ नग | १२० | १९,६८,०००/- |

उपरोक्त पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमधील हॉटेल्स्, मंगल कार्यालये, मंडई तसेच शासकीय /खाजगी व गर्दीच्या ठिकाणी मास्क न वापरता संचार करणा-या व्यक्तींवर राज्य शासनाने तयार केलेल्या नियमावलीची अंमलबजावणी होते किंवा नाही याकरीता पिंपरी चिंचवड मनपाच्या तपासणी पथकारीता ०४ इनोव्हा वाहने दि. २४/०५/२०२१ ते दि.२०/०९/२०२१ (१२० दिवसाकरिता) या कालावधीकरीता करारनामा न करता, निविदा न मागविता, थेट पद्धतीने मे.सॅम इंटरप्रायझेस या एजन्सीन कडुन उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. सदरकामी मे.सॅम इंटरप्रायझेस यांनी वाहन उपलब्ध करुन इनोव्हा भाडेदराचे र.र.१९,६८,०००/- (अक्षरी र.रु.एकोणीस लाख अठुसष्ठ हजार फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८८० विषय क्रमांक – २३
दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – वैद्यकिय मुख्यालय
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/७६१/२०२१, दि.२९/०६/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अँटोक्लस्टर कोवीड रुग्णालय तात्काळ प्रभावाने दि.०९/०५/२०२१ रोजी अधिग्रहीत करणेत आलेले असुन अँटोक्लस्टर कोवीड हॉस्पीटलमध्ये सेवा देत असणारे मे.स्पर्श हॉस्पीटचे तसेच इतर संस्थाचे वैदयकिय अधिकारी/पॅरामेडीकल स्टाफ व इतर कर्मचारी यांच्या सेवा अधिग्रहित करुन त्या सर्व अधिकारी कर्मचा-यांना महापालिकेने रुग्णालय अधिग्रहित केलेल्या कालावधीतील नियमानुसार देय असलेले पुढील वेतन/भत्ते अटि-शर्तीसह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत देणेबाबत आदेश क्र आ.क्र/कावि/२७/२०२१ दि.०९/०५/२०२१ अन्वये मान्यता दिलेली आहे. तदनंतर अँटोक्लस्टर कोवीड रुग्णालयामघ्ये एकही रुग्ण नसल्याने सदरचे रुग्णालय रुग्ण संख्ये अभावी मा.आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र.मसाभा/५/कावि/६६१/२०२१ दि.३१/०५/२०२१ अन्वये दिनांक ३१/०५/२०२१ पासुन बंद करणेत आले आहे. नोडल अधिकारी अँटोक्लस्टर रुग्णालय यांचेकडील पत्र क्र.अँटोक्लस्टर-DCH/कावि/३२९/२०२१ दि.२०/०५/२०२१ नुसार दि.१०/०५/२०२१ ते ३१/०५/२०२१ या कालावधीत अँटोक्लस्टर रुग्णालयात मे.स्पर्श हॉस्पीटल यांचेकडील कामकाज करणारे सर्व कन्सल्टंन्ट (तज्ञ)/वैदयकिय अधिकारी/ पॅरामेडीकल स्टाफ व इतर कर्मचारी यांचा हजेरी अहवाल व कागदपत्र सादर केली आहेत. अँटो क्लस्टर कोवीड रुग्णालयातील ने स्पर्श हॉस्पीटल कडील कर्मचा-यांची सेवा महापालिकेने अधिग्रहित केलेने त्यांना अधिग्रहण कालावधीतील मानधन दि.०९/०५/२०२१ चे आदेशानुसार महापालिकेमार्फत अदा करणे आवश्यक आहे. त्यानुसार महापालिकेचे अँटोक्लस्टर कोवीड रूग्णालयातील मे.स्पर्श संस्थेकडील कार्यरत वैदयकिय तज्ञ/वैदयकिय अधिकारी/पॅरामेडीकल स्टाफ व इतर कर्मचारी असे एकुण १८१ अधिकारी/कर्मचारी यांना शासन निर्णय व किमान वेतन दरानुसार दि.१०/०५/२०२१ ते ३१/०५/२०२१ या कालावधीतील मानधन र.रु.३४,०६,१८७/- (अक्षरी र.रु.चौतीस लाख सहा हजार एकशे सत्याऐंशी फक्त) अदा करणेस अथवा त्यापोटी येणा-या प्रत्यक्ष खर्चास तसेच सदरचा खर्च मध्यवर्ती भांडार विभागाकडील कोविड-१९ या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८८१ विषय क्रमांक – २४
दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय
सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.नीता पाडाळे
संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे पत्र क्र. विमुका/५/कावि/५००/२०२१, दि.२८/०६/२०२१

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.Ele/Ho/DZ/44/11/2020-21 अन्वये पिंपळे निलख आ.क्र.३९८ येथे उद्यान विकसित करणेकामी मे.अबान इलेक्ट्रीक वर्क्स नि.र.रू.75,20,921/- (अक्षरी र.रु.पंच्यात्तर लाख वीस हजार नऊशे एकवीस फक्त) पेक्षा 23.3% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.57,68,546/- पर्यंत काम करून घेणेस, निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली

वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८८२ विषय क्रमांक – २५

दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – इ क्षेत्रिय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.इक्षेका/नि-६/कावि/३२७/२०२१, दि.२५/०६/२०२१

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ क्षेत्रिय कार्यालयाकडील विदयुत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र 'अ' मधील (१ ते २३) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ९८८३ विषय क्रमांक – २६

दिनांक –०७/०७/२०२१ विभाग – अ क्षेत्रिय, स्थापत्य

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.अक्षेका/स्था/८२१/२०२१, दि.२९/०६/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

